# सातारा जिल्हा परिषद,सातारा

सामान्य प्रशासन विभाग

कार्यालयाचा पत्ता : सातारा-कोरेगांव रोड, सदर बझार कॅम्प, ता.जि.सातारा

कार्यालय दूरध्वनी क्रं. 02162-295053 Email-dyceogadstr@gamil.com


जा.क्रं.आस्था-2(5)/224/2024 दिनांक :-10/02/2024

## जाहिर प्रकटन

जिल्हा परिषद सरळसेवा पदभरती २०२३ अन्वये जिल्हा परिषद सातारा अंतर्गत वरिष्ठ सहाय्यक (लेखा), विस्तार अधिकारी(सांख्यिकी), विस्तार अधिकारी (कृषी) व आरोग्य पर्यवेक्षक या चार संवर्गातील घोषित केलेल्या रिक्त पदांकरीता घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेअंती गुणवत्ता यादी व गुणवत्ता यादीनुसार सामाजिक व समांतरित आरक्षण विचारात घेवून अंतरिम निवड यादी सातारा जिल्हा परिषदेच्या https://zpsatara.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेत आलेली आहे.

प्रसिध्द करणेत आलेल्या जिल्हा परिषद सातारा अंतर्गत वरिष्ठ सहाय्यक (लेखा), विस्तार अधिकारी (सांख्यिकी), विस्तार अधिकारी(कृषी) व आरोग्य पर्यवेक्षक या चार संवर्गतील घोषित रिक्त पदे भरणे करीता अंतरिम निवड यादीतील उमेदवारांचे मूळ शैक्षणिक कागदपत्रे व इतर आवश्यक सर्व दस्तऐवज तपासणी करणे करीता गुरुवार दिनांक १५/०२/२०२४ रोजी जिल्हा परिषद सातारा येथे खालील प्रमाणे नमूद ठिकाणी आयोजीत करणेत आलेले आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | कागदपत्रांची पडताळणी ठिकाण | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | अर्थ विभाग, दुसरा मजला जि प सातारा | 10.00 सकाळी वाजता |
| 2 | विस्तार अधिकारी (सांख्यिकी) | सामान्य प्रशासन विभाग स्थायी समिति सभागृह, चौथा मजला जि प सातारा | 11.00 सकाळी वाजता |
| 3 | विस्तार अधिकारी (कृषि) | कृषि विभाग, तिसरा मजला जि प सातारा | 10.00 सकाळी वाजता |
| 4 | आरोग्य पर्यवेक्षक | आरोग्य विभाग, पहिला मजला जि प सातारा | 10.00 सकाळी वाजता |

जिल्हा परिषद सातारा अंतर्गत गट "क" मधील सरळसेवेतील पदे भरण्यासाठीची जाहिरात क्र. १ / २०२३ मधील परिच्छेद १९ येथे नमुद केले प्रमाणे मुळ शैक्षणिक कागदपत्रे व इतर आवश्यक सर्व मुळ दस्तऐवज त्यांची स्वसाक्षांकित १ प्रत व दोन रंगीत पासपोर्ट साईज फोटोसह गुरुवारी दिनांक १५/०२/२०२४ रोजी सकाळी वरील नमूद वेळेनुसार सातारा जिल्हा परिषद,सातारा कोरेगांव रोड, सदर बझार कॅम्प सातारा येथे न चुकता उपस्थित राहावे. अंतरिम निवड यादीमध्ये समावेश असणा-या व कागदपत्र पडताळणी करीता पाचारण करणेत आलेल्या उमेदवारास अंतिम निवडीचा कोणताही दावा करता येणार नाही. किंवा हक्क सांगता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच उक्त दिनांक १५/०२/२०२४ रोजी सकाळी उपरोक्त नमूद वेळेत कागदपत्रे / दस्तऐवज पडताळणी करीता गैरहजर राहणा-या उमेदवारांना निवड प्रक्रिये संबंधात कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही. किंवा हक्क सांगता येणार नाही. याची नोंद घ्यावी. कागदपत्रे पडताळणीस उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

कागदपत्रे पडताळणी अंती अंतिम निवड यादी मा.जिल्हाधिकारी, सातारा यांचे अध्यक्षतेखालील जिल्हा निवड समितीचे मान्यतेनंतर सातारा जिल्हा परिषदेचे संकेतस्थळावर यथावकाश प्रसिध्द करणेत येईल.

दिनांक :- १०/०२/२०२४

स्थळ- सातारा

स्वाक्षरीत/-

(निलेश घुले)

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र)

सातारा जिल्हा परिषद सातारा